Item No. 2 (3)

व्यवस्थापन परिषदेची दिनांक १४ ऑगस्ट, २०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही |
|---|---|
| बाब १ | **कोंकण, कोल्हापूर आणि सांगली येथील महापूरग्रस्तांसाठी मुंबई विद्यापीठातर्फे आर्थिक सहाय्य करणेबाबत** |
| ठराव | कोंकण, कोल्हापूर आणि सांगली, सातारा येथील पुरग्रस्तांचे विस्कळीत झालेले जिवनमान पुर्वपदावर आणण्यासाठी एक सामाजिक बांधिलकी म्हणून मुंबई विद्यापीठातर्फे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २५ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याचे मंजुर करण्यात आले.<br>तसेच विद्यापीठाने पुरग्रस्त परिस्थितीचा अभ्यास करुन झालेल्या नुकसानीच्या व्याप्तीनुसार कशाप्रकारे मदत करता येईल व इतर कुठल्या मार्गाने अधिक निधी कसा गोळा करता येईल याचा आढावा घेण्याकरिता खालील प्रमाणे अभ्यासगट गठीत करण्यात आला. सदर अभ्यासगट कोंकण विभाग व कोल्हापुर-सांगली अशा दोन क्षेत्रात विभागून प्रत्यक्ष पाहणी करुन आपला अहवाल सादर करेल.<br>१. श्री प्रदिप सावंत, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य<br>२. प्रा. रविकांत सांगुर्डे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य<br>३. डॉ. सुनिल पाटील, संचालक, विद्यार्थी विकास विभाग<br>४. डॉ. सुधिर पुराणिक, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना<br>५. डॉ. मोहन अमरुळे, संचालक, क्रिडा व शाररिक शिक्षण<br>तसेच विद्यापीठातर्फे परिपत्रक काढून संलग्नित महाविद्यालयांनी कोंकण, कोल्हापूर, सांगली आणि सातारा येथील अतिवृष्टी व महापुरामुळे नुकसान झालेल्यांचे जीवनमान पुर्वपदावर आणण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीमधे राशी जमा करण्यासाठी सहाय्य करावे व या परिसरातील महाविद्यालयातील शैक्षणिक पुर्नबांधणीसाठी आवश्यक साहित्य देऊन मदत करण्यासंदर्भात आवाहन करण्यात येईल असेही ठरले. तद्वतच कोकणातील महाड नागोठणे, चिपळूण व राजापुर या ठिकाणी कायमस्वरुपी आपत्ती निवारण केंद्र (Disaster Relief Center) स्थापित करुन सदर केंद्रामध्ये आपत्ती निवारणा संदर्भात आवश्यक साधनसामुग्री आपत्ती निवारण निधीतुन उपलब्ध करुन द्यावी, असा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. |
| विद्यार्थी विकास विभाग | मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांचेकडून मुंबई मध्य व नवी मुंबई, मुंबई पश्चिम उपनगरे, ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा, रत्नागिरी जिल्हा आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील कोल्हापूर येथील महापूरग्रस्तांसाठी उपयोगी वस्तुचे सहाय्य ज्या महाविद्यालयांनी केले त्या महाविद्यालयांची यादी आपल्या माहितीसाठी सोबत जोडीत आहेत. (सोबत जोडपत्र-१) तसेच महाड नागोठणे, चिपळूण व राजापुर या ठिकाणी कायमस्वरुपी आपत्ती निवारण केंद्र (Disaster Relief Center) स्थापित करुन सदर केंद्रामध्ये आपत्ती निवारणा संदर्भात आवश्यक साधणसामुग्री आपत्ती निवारण निधीतुन उपलब्ध करुन देण्यासाठी मा. कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांचेकडून आपत्ती निवारण केंद्र स्थापन करण्याबाबत समिती गठीत करण्यास विनंती केली आहे. (सोबत जोडपत्र-२) |
| बाब क्र.२ | **Permission to donate obsolete Computers to needy Primary School.** |
| ठराव | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हडी न.२ जठारवाडा ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग यांनी विनंती केल्याप्रमाणे विद्यापीठातील जुन्या संरचनेमध्ये असलेले संगणक देण्यास मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| | तसेच कोकणातील इतर गरजु शांळाना व महाविद्यालयांना जुने संरचना असलेले व वापरात नसलेले संगणक व विद्यापीठामध्ये गरजेचे नसलेले इतर शैक्षणिक साहित्य याबाबत सर्व प्रशासकीय प्रकीया पार पाडून देण्याकरिता एक समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती गठीत करण्याचे अधिकार माननीय कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. |
| विद्यार्थी विकास विभाग | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हडी न.२ जठारवाडा ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग यांनी विनंती केल्याप्रमाणे विद्यापीठातील जुन्या संरचनेमध्ये असलेले संगणक पाठविण्यात आले.<br><br>सदर विभागाच्या पत्र क डीएसडब्ल्युआयबी/आयसीडी/२०१९-२०/२७८, दि. ११ सप्टेंबर २०१९ नुसार कोकणातील इतर गरजु शांळाना व महाविद्यालयांना जुने संरचना असलेले व वापरात नसलेले संगणक व विद्यापीठामध्ये गरजेचे नसलेले इतर शैक्षणिक साहित्य याबाबत सर्व प्रशासकीय प्रकीया पार पाडून देण्याकरिता एक समिती गठीत करण्यात करण्याबाबतचा मा. कुलगुरुना विनंती करण्यात आली आहे. |
| बाब क्र.४ | **सुरक्षा अधिकारी तसेच सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांना गणवेश देण्याबाबत.** |
| ठराव | सुरक्षा अधिकारी तसेच सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांना गणवेश देण्याबाबत व गणवेशाचे स्वरुप ठरविण्याकरिता एक समिती गठीत करण्यात यावी, असा ठराव पारित करण्यात आला. समिती गठित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. |
| सामान्य प्रशासन विभाग, फोर्ट विभाग | १. प्राचार्य डॉ. अजय भामरे २. डॉ. चंद्रशेखर स. कुलकर्णी ३. श्री. नामदेव बुकाणे यांना सामान्य प्रशासन विभागामार्फत क्र. GAD/ICM/2019-20/754 दि. २६ सप्टेंबर, २०१९ नुसार समिती गठित केल्याबाबत पत्राद्वारे कळविण्यात आले होते. तसेच सदर बैठकितील ठरावाबाबत प्राचार्य डॉ. अजय भामरे व श्री. नामदेव बुकाणे यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी या ठरावाबाबत बैठक झाली आहे असे तोंडी निर्देश दिले आहेत. |
| बाब क्र.५ | **विद्यापीठ प्रशासकीय विभागांचे पुर्नःनिर्धारण करुन प्रशासनात सुलभता आणणे बाबत.** |
| ठराव | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठ प्रशासकीय विभागांचे प्रशासकिय सोयींसाठी पुर्नःनिर्धारण करण्याबाबतच्या प्रस्तावाची नोंद घेण्यात आली. |
| कुलसचिवांचे कार्यालय | क्र. आर.ई.जी./आय.सी.सी./२०१९-२०/०९ दि. ०८ नोव्हेंबर, २०१९ हे परिपत्रक काढण्यात आले आहे. सोबत प्रत जोडली आहे. |
| बाब क्र.६ | **मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात सांस्कृतिक भवन या इमारतीच्या नुतनीकरण्याच्या कामासाठी तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे आर्टस् ॲड कल्चरल सेंटर तयार करण्याबाबत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.** |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात सांस्कृतिक भवन या इमारतीच्या दुरुस्ती व नुतनीकरण्याच्या कामासाठी तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे आर्टस् ॲड कल्चरल सेंटर तयार करण्याबाबत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.११४/विशि-२ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९ स्विकारण्यात आला. शासनाकडून निधी प्राप्त होईपर्यंत विद्यापीठ निधी मधून सोय करण्याकरिता सदर बाब वित्त व लेखा समितीसमोर सादर करण्यात यावी व पुरवणी अंदाजपत्रकात समावेश करण्यात यावा. |
| विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग | |

| | |
|---|---|
| बाब क्र. ७ | **अकृषी विद्यापीठातील रिक्त असलेली शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदे भरण्याावरील निर्बंध शिथिल करणेबाबतचा शासन निर्णय मान्यतेस्तव.** |
| ठराव | अकृषी विद्यापीठातील रिक्त असलेली शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदे भरण्याावरील निर्बंध शिथिल करणेबाबतच्या महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क. संकीर्ण-२०१७/प्र.क.१६६-अ/१७/विशि-१ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ स्विकारण्यात आला. विद्यापीठात २११ पदे रिक्त आहेत. ८० टक्के पदे भरण्याची मान्यता मिळाल्याने, नेमकी कोणती पदे भरावीत हे ठरविण्याचे अधिकार माननीय कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. या संदर्भात संबंधित विभागाने आवश्यक कार्यवाही तातडीने करावी अशी सुचना मा. कुलगुरूंनी कुलसचिवांना केली. |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि) | महाराष्ट्र शासनाने दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अंशत: पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पदभरती करण्याबाबतची प्रक्रिया सुरु असुन, त्या अनुंषगाने ८० टक्के पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्याकरिता बिंदुनामावलीमध्ये नव्याने निर्माण झालेल्या SEBC व EWS या आरक्षणाचा अंतर्भाव करण्याचे काम विभागामार्फत सुरु आहे. सदर गोषवारा विशेष कक्षांकडून प्रमाणित करुन घेतल्यानंतर मावक कोकण भवन कडून मंजुर करुन घेण्यात येईल. त्यानंतर बिंदुनामावली, विषय निहाय, संवर्ग निहाय, रिक्त पदांचा पदभरतीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरीता सादर करण्यात येणार आहे. |
| | मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी आलेली बाब |
| बाब क्र. ८ | **Providing and installing of institutional, Educational furniture of reputed brands to new Exam House Building, Vidyanagari campus, University of Mumbai, Mumbai – 400 098** |
| ठराव | बांधकाम समितीच्या दिनांक २७ मे, २०१९ च्या सभेमध्ये नविन परिक्षा भवन येथे शैक्षणिक व इतर फर्निचर बसविण्याबाबत झालेला निर्णय क्रय समितीच्या (Purchase Committee) दिनांक १४ ऑगस्ट २०१९ च्या तातडीच्या सभेमध्ये विचारार्थ ठेवण्यात आला. त्यावर क्रय समितीने प्राप्त निविदा धारकांपैकी न्युनतम दर असलेले (L-1) निविदाधारक मे. जलाराम स्टील फर्निचर प्रा. लि. यांना नविन परिक्षा भवनातील फर्निचर पुरवठा करण्या संदर्भात तातडीने कायदिश देण्यात यावेत असा निर्णय घेण्यात आला. ही बाब बांधकाम समिती मध्ये ठेवण्यात आल्याने समान लेखा संहिता (Common Account Code) मधील तरतुदी नुसार व्यवस्थापन परिषदेसमोर अंतिम निर्णयासाठी ठेवण्यात येते. त्यामुळे ही बाब व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आली. अन्यथा क्रय समितीच्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेसमोर सादर केल्या जात नाहीत, हे देखील चर्चे दरम्यान स्पष्ट करण्यात आले. क्रय समितीच्या दिनांक १४ ऑगस्ट २०१९ च्या तातडीच्या सभेच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव व्यवस्थापन परिषदेने केला. |
| विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग | मे. जलाराम स्टील फर्निचर प्रा. लि. यांना दि. २७ ऑगस्ट, २०१९ रोजी कायदिश देण्यात आले असून नविन परिक्षा भवन या इमारतीसाठी मे. जलाराम स्टील फर्निचर प्रा. लि. यांचे कडून फर्निचर पुरविण्याचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. |

| | **चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारित झाले.** |
|---|---|
| १. | जम्मु काश्मिर बाबत असलेले संविधानातील कलम ३७० रद्द झाले आहे. त्यानुसार माननीय पंतप्रधान यांनी जम्मु काश्मिरमध्ये शैक्षणिक विकास करण्याचे आव्हान केल्याने मुंबई विद्यापीठामार्फत या प्रदेशात शैक्षणिक दृष्टया कशी मदत करता येईल व शैक्षणिक विकास कसा साधता येईल याचा अभ्यास करण्याकरिता एक तज्ज्ञ समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती या प्रदेशातील विद्यार्थ्यांकरिता देवाण-घेवाण कार्यक्रम (गुलर्मग, पहलगम, सोनर्मग इत्यादी) सांस्कृतिक देवाण-घेवाण कार्यक्रम व विविध प्रमाणप्रत्र अभ्यासक्रम, तसेच इतर अभ्यासक्रम व्हॅचुअल क्लासरुम मार्फत कशाप्रकारे विकसित करता येईल याचा अहवाल सादर करेल. सदर समिती गठीत करण्याचे अधिकार माननीय कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. तसेच विद्यापीठाच्या दुरशिक्षण संस्थेमार्फत या प्रदेशातील विद्यार्थ्यांना एक विशेष बाब म्हणून अभ्यासक्रमास प्रवेश देण्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडे विनंती करण्यात येईल. |
| विद्यार्थी विकास विभाग | माननीय पंतप्रधान यांनी जम्मु काश्मिरमध्ये शैक्षणिक विकासाबाबत केलेल्या आव्हानानुसार मुंबई विद्यापीठामार्फत या प्रदेशात शैक्षणिक दृष्टया कशी मदत करता येईल व विद्यार्थ्याकरिता देवाण-घेवाण कार्यक्रम व विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम गुलमर्ग पहलगम, सोनमर्ग इत्यादी सांस्कृतिक देवाण-घेवाण कार्यक्रम व विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच इतर अभ्यासक्रम व्हॅचुअल क्लासरुम मार्फत कशाप्रकारे विकसित करता येईल यासाठी तज्ज्ञ समिती गठीत करण्याचे अधिकार माननीय कुलगुरुंना प्रदान करण्यात आले आहेत व याबाबत मा. कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांना तज्ज्ञ समिती गठीत करण्यास विनंती करण्यात आली आहे. (सोबत जोडपत्र) |
| विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग | कार्यालयीन टिपण्णी क्र. APD/ICD/19-20/418, दि.१५/११/१९ अन्वये मुंबई विद्यापीठामार्फत जम्मु कश्मीर प्रदेशात शैक्षणिक दृष्टया कशी मदत करता येईल व शैक्षणिक विकास कसा साधता येईल याचा अभ्यास करण्याकरिता एक तज्ज्ञ समिती गठित करण्याकरिता मा. कुलगुरुंनी तज्ज्ञांची नावे सुचविण्याकरीता विभागामार्फत टिपण्णी सादर करण्यात आलेली आहे. |
| २. | **व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ४ जुलै,२०१९ रोजीच्या बैठकीतील बाब क्रमांक १४ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली.**<br><br>मा. कुलगुरु व प्र-कुलगुरु यांच्या करिता (Innova crysta ZX model) हे नविन वाहन खरेदी करण्यास शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दि. १७/४/२०१५ च्या अधिन राहुन (GEM) वर नोंदणी करुनद्ध मान्यता देण्यात आली. नविन वाहनासाठी होणारा खर्च विद्यापीठ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सन २०१९-२० मधील '५ इतर खर्च वाहनांची खरेदी' या अर्थशिर्षातून करण्यात यावा. तद्वतच, यापुढे विषय परिषदेसमक्ष सादर करताना संबधित अर्थशिर्षातील तरतुदींचे विवरण सोबत सादर करावे असे निर्देश परिषदेने दिले.<br><br>**च्याऐवजी खालीलप्रमाणे वाचावे**<br><br>बाब क्रमांक १४ मा. कुलगुरु व प्र-कुलगुरु यांच्या करिता नविन वाहन खरेदी करण्यास (GEM) वर नोंदणी करुन किंवा इतर कोणत्याही प्रचलित पध्दतीनुसार किंवा थेट अधिकृत वितरकांकडून वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. नविन वाहनांसाठी होणारा खर्च विद्यापीठ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सन २०१९-२० मधील '५ इतर खर्च वाहनांची |

| | |
|---|---|
| | खरेदी' या अर्थशिर्षातून करण्यात यावा. तद्वतच, यापुढे विषय परिषदेसमक्ष सादर करताना संबधित अर्थशिर्षातील तरतुदींचे विवरण सोबत सादर करावे असे निर्देश परिषदेने दिले. |
| सामान्य प्रशासन विभाग, फोर्ट | खरेदी पत्र क्र. (purchase order) GAD/ICM/19-20/793 दि. ७/१०/१९ अन्वये मा. कुलगुरुकरिता वाहन क्र. MH-01-CQ-1857 (Toyota Fortuner) रु.३८,५६,९८२/- तसेच मा. प्र-कुलगुरुंकरिता वाहन क्र. MH-01-DK-3993 (Toyota Cresta) रु.२७,०३,४२१/- प्रमाणे एकुण रक्कम रु. ६५,६०,४०३/- अन्वये दोन नविन वाहने खरेदी करण्यात आली. |

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)